अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक
कारागृह व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य,यांचे
कार्यालय,जुनी मध्यवर्ती इमारत,२ रा मजला,पुणे-१
दुरध्वनी क्र.०२०-२६१२४८१५
फॅक्स क्र. ०२०-२६१२५८७८
Email-igoffice.budget-mh@gov.in

परिपत्रक ८८०८

जा.क्र.अपोमसंवकामनि/पुणे/क-५/कुकनि/शिष्युवृत्ती/१५-१६/ दि.७८/९/२०१६

**विषयः- सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षासाठी कुटुंब कल्याण निधीतून अधिकारी/कर्मचा-यांच्या मुला-मुलींना शिष्युवृती व बक्षिस रुपाने आर्थिक मदत देणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की,महाराष्ट्र कारागृह नियमावली-१९७९,प्रकरण-१२,नियम-१० अन्वये महाराष्ट्र राज्य कारागृह कर्मचारी कुटुंब कल्याण निधीच्या मध्यवर्ती समितीच्या बैठकीत वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार कारागृह व सुधारसेवा विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या मुला-मुलींना प्रत्येक वर्षी शिष्युवृती व बक्षिस वाटप करण्यात येते.

यास्तव सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षासाठी कारागृह अधिकारी/कर्मचारी यांच्या मुला-मुलींना बक्षिस व शिष्यवृती वाटप करण्यासाठी विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक यांनी त्यांचे कार्यालय व अधिनस्त कारागृहातील पात्र अधिकारी/कर्मचारी यांच्या सदरचे परिपत्रक निर्दशनास आणून द्यावे व याबाबतचे प्रस्ताव **एकत्रित संकलित** करुन सोबत जोडलेल्या निकषानुसार शिफारशीसह **दिनांक २०/९/२०१६** पूर्वी मुख्यालयास न चुकता सादर करण्यात यावे.सोबत जोडलेल्या निकषाप्रमाणे सदरचे प्रस्ताव **एकत्रित संकलित** करुन सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक यांची राहील.

**(डॉ.भूषण कुमार उपाध्याय )**
**अपर पोलीस महासंचालक व**
**महानिरीक्षक कारागृह व**
**सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**

प्रति,

१) विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह),दक्षिण विभाग,भायखळा,मुंबई.
२) कारागृह उपमहानिरीक्षक,नागपूर/पुणे/औरंगाबाद
३) प्राचार्य,दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,पुणे.६
४) कक्ष अधिकारी (सर्व),अपोमवमकावसुसे यांचे कार्यालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१

२/- सदरचे परिपत्रक अधिकारी/कर्मचारी यांच्या निर्दशनास आणून त्यांचे विनंती अर्ज कार्यालयात सादर करणेबाबत सूचित करण्यात यावे.

१२
८/९/१६

**सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षासाठी कुटुंब कल्याण निधीतून बक्षिस व शिष्युवृत्ती वाटप करणेसाठी खालील निकषानुसार प्रस्ताव सादर करावे.**

---

१) दहावी ते बारावी आणि पदवी,पदव्युत्तर या अभ्यासक्रमासाठी प्राप्त होणारे अर्जातील खालील निकषानुसार पात्र अधिकरी/कर्मचा-यांचीच माहिती खालील प्रपत्रात अभ्यासक्रम निहाय क्रमाने माहिती **Microsoft Excel sheet** मध्ये **DV-TTsurekh** या फॉन्टमध्ये तयार करुन सी.डी.मध्ये पाठवावी.

| अ.क्र | कार्यालयाचे नांव | अधिकारी /कर्मचारी नावं | पदनाम | मुलाचे/मुली चे नांव | शैक्षणिक अभ्याक्रम | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | प्राविण्य विषय | शिष्युवृत्ती रक्कम | बक्षिस रक्कम | एकूण (12+13 ) |
| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |

**२) शैक्षणिक अभ्यासक्रमः-**

**अ) इयत्ता १० ते १२ वी पर्यत पात्रताः-**

कला/वाणिज्य शाखेसाठी प्रथम श्रेणी ६० %,विज्ञान शाखेसाठी ७० % किंवा त्या पुढीलसाठी शिष्युवृत्तीसाठी रुपये २०००/-तसेच एखाद्या विषयात प्राविण्य असल्यास कला/वाणिज्य शाखेसाठी ७५ % , विज्ञान शाखेसाठी ८० % किंवा त्यापुढील साठी बक्षिस रुपये १०००/- पर्यत देण्यात येईल.

**ब) सर्व शैक्षणिक पदवी व पदव्युत्तर,पदविकाः-**

**(कला,वाणिज्य,विज्ञान,अभियांत्रिकी,वैद्यकीय)** :-प्रथम श्रेणी ६०% व त्यापुढील साठी फक्त शिष्युवृत्ती रुपये २०००/- पर्यत देण्यात येईल.

**३)** सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षातील **दिनांक १/७/२०१५ ते ३०/६/२०१६** या कालावधीतील पात्र गुणपत्रिकानुसार अधिकारी/कर्मचा-यांचे अर्ज विचारात घेतले जातील.

**४)** विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत किंवा पुढील वर्षात वाटप होणा-या शिष्युवृत्तीसाठी पात्र केले जाणार नाहीत.

**५)** सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षासाठी पदवी,पदव्युत्तर,पदविका या अभ्यासक्रमाच्या निकालाच्या गुणपत्रिकेतील दि.१/७/२०१५ ते ३०/६/२०१६ पर्यंत असतील अशाच अधिकारी/कर्मचा-यांचे अर्ज ग्राहय धरावे.

६) वरील अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकेत दि.१/७/२०१६ व त्यापुढील दिनांक असल्यास अशा कर्मचा-यांचे अर्ज व दिनांक ३०/७/२०१५ रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांना दि.१/७/२०१५ ते ३०/६/२०१६ या कालावधीत पात्र असलेल्या गुणपत्रिकानुसार लाभ मिळणेसाठी त्यांचेही अर्ज स्वतंत्र पाठवावे.

७) सेवानिवृत्त,रजेवर अथवा निलंबित असलेल्या कर्मचा-यांना विहित मुदतीत अर्ज सादर करणेबाबत समज देण्यात यावी.

८) कारागृह व सुधारसेवा विभागातील किंवा इतर विभागातील (प्रतिनियुक्ती) अधिकारी/कर्मचारी हे कुटुंब कल्याण निधीचा सभासद (वर्गणीदार) असणा-यांचे अर्ज ग्राहय धरावे.

९) गुणपत्रिकेची मागील व पुढील दोन्ही बाजूची स्पष्ट दिसणारी साक्षांकित केलेली छायाकिंत प्रत जोडावी.